# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### मुंबईच्या उपनगरातील गोरेगांव पश्चिम येथील सिध्दार्थनगर येथील मोकळया जागेच्या आरक्षणाबाबत

**(१) ६५४१ (०७-०४-२०१५). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील गोरेगांव पश्चिम येथील सिध्दार्थनगर येथे ११५० चौ.मी.ची. मोकळी जागा असून ही जागा गेली अनेक वर्षे स्किम ऑफ ओपन स्पेस (मोकळया जागेसाठी आरक्षण) म्हणून राखीव आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जागेचे आरक्षण बदलण्याचा म्हाडाचा प्रस्ताव आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्लॉटच्या चारही बाजुला इमारती आहेत व मधोमध ही एकमेव मोकळी जागा असून विभागातील मुलांना खेळण्यासाठी हा भूखंड हवा असल्याने परिसरातुन या प्रस्तावास विरोध आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (३०-०८-२०१६) :**(१), (२), (३), (४) व (५) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांचेकडून प्राप्त अहवालानुसार मुंबई महानगरपालिकेच्या सन १९९१ च्या मंजूर विकास आराखड्यानुसार सदरहू भूखंड “रहिवासी क्षेत्र” (R-Zone) म्हणून दर्शविले आहे. तसेच मुंबई मनपाच्या वेळोवेळी मंजुर झालेल्या अभिन्यासानुसार सदर भूखंड “R-१” (रहिवासी भूखंड) म्हणून दर्शविले आहे. सदर अभिन्यासात अन्य ठिकाणी विभागातील मुलांना खेळण्यासाठी वि.नि.नि. नुसार आवश्यक मोकळे भूखंड (Recreation Ground) करमणूकीचे/खेळाचे मैदान म्हणून आरक्षित आहेत.

प्रश्नांकित भूखंडावर सद्य:स्थितीत परवडणारी घरे निर्माण करण्यासाठी गृहनिर्माण योजना प्रस्तावित करण्यात येत आहे.

---

**मुंबईतील गावठाण कोळीवाड्याचे पुनर्विकासाबाबत**

**(२) ७९०५ (०७-०४-२०१५). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.संजय पोतनीस (कलिना), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गावठाण कोळीवाड्याचे पुनर्विकासाचे काम मार्गी लागावे याकरिता मा.मुख्यमंत्री महोदयांनी नुकतेच माहे जानेवारी, २०१५ मध्ये केंद्र सरकारच्या मान्यता प्राप्त एजन्सीकडून त्यांची सीमा निश्चिती करण्यास तत्वत: मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बाल्कनी, टेरेस, प्लॉटवरबेड या वाया जाणाऱ्या एफएमआयची भरपाई म्हणून दिला जाणारा फंजीबल एफएसआय मुंबईतील जुन्या गृहनिर्माण सोसायट्यांना देण्याचा निर्णय देखील घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निर्णयावर अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे,

(४) असल्यास, सदर निर्णयाचा फायदा मुंबईतील किती गृहनिर्माण सोसायट्यांना होणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०९-२०१६) :**(१) बृहन्मुंबई क्षेत्रातील कोळीवाड्यांचे प्रत्यक्ष निरिक्षण करून सिमांकन करण्यासाठी अनुसरावी लागणारी कार्यपध्दती व मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यासाठी महसूल व वन विभागाच्या दिनांक १९/११/२०१२ च्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने अहवालही सादर केलेला होता. त्यांनी निश्चित केलेली कोळीवाड्यांची संख्या व केंद्र शासनाच्या कृषि व पशुसंवर्धान दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय मंत्रालय दिल्ली यांच्या अधिपत्याखालील केंद्रीय सागरी मत्स्यकी संशोधन संस्था, कोची (भारतीय कृषि अनुसंधान परिषद) यांनी केलेल्या महाराष्ट्र राज्याच्या सागर जनगणना सन २०१० च्या सर्व्हेक्षणामध्ये दर्शविलेली कोळीवाडयांची संख्या यामध्ये विसंगती आढळल्याने याबाबत केंद्रीय सागरी मत्स्यकी संशोधन संस्था, कोची यांचेकडील प्रतिनिधीसह संयुक्त स्थळ निरीक्षण प्रस्तावित करणेत आलेले होते. दिनांक ५.९.२०१५ रोजी मुंबई शहर जिल्ह्यातील कोळीवाडयांची पहाणी करणेत आलेली आहे. मुंबई उपनगर जिल्ह्यातील कोळीवाडयांची पहाणी करण्याचे काम शिल्लक आहे.

(२) ते (४) बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीमध्ये शासनाकडील दिनांक ६.१. २०१२ रोजीच्या अधिसूचनेअन्वये फेरबदल मंजूर होऊन फंजीबल चटई क्षेत्र निर्देशांकाची तरतूद विनियम ३५ (४) अन्वये अंमलात आलेली आहे. फंजीबल चटई क्षेत्राची अंमलबजावणी दिनांक ६.१.२०१२ पासून सुरू आहे.

सदर तरतूदीनुसार नियमित चटई क्षेत्रावर फंजीबल चटई क्षेत्र देणेची तरतूद आहे. जुन्या सहकारी गृहनिर्माण सोसायटयांचे संदर्भात विशेषत्वाने असा निर्णय झालेला नाही. सदर उपलब्ध राहणार आहे त्याप्रमाणे जुन्या सहकारी पात्र गृहनिर्माण सोसायटयांनाही पुनर्विकासाच्या नियमानुसार फंजीबल चटई क्षेत्र उपलब्ध होणार आहे.

___

**मुंबई उपनगरातील अंधेरी (पश्चिम) येथील म्हाडा जुहू इर्ला नाल्यावरील ले-आऊट मधील म्हाडाच्या राखीव आर जी प्लॉट नं. ३ व ६ अंजुमन-ए-शियाते अली ट्रस्टला बहाल करण्याबाबत**

**(३) १४५९४ (०७-०४-२०१६). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील अंधेरी (पश्चिम) येथील म्हाडा जुहू इर्ला नाल्यावरील ले-आऊट मधील आर जी प्लॉट नं. ३ व ६ वरील म्हाडाचा राखीव असलेला प्लॉट म्हाडातील काही अधिकाऱ्यांच्या संगनमताने अंजुमन-ए-शियाते अली ट्रस्टला बहाल करण्याबाबत तक्रार प्राप्त झाली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, म्हाडाने आताच मुंबई महानगरपालिकेला सादर केलेल्या जुहू विभागाच्या आराखडयामध्ये प्लॉट नं. ३ व ६ यांची नोंद मोकळे मैदान म्हणून केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुख्य अधिकारी, मुंबई बोर्ड, म्हाडा यांनी सन २०१३ मध्ये पत्रकाद्वारे स्पष्ट केले आहे की, प्लॉट नं. ३ हा मोकळया मैदानासाठी राखीव राहणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मोकळया मैदानासाठी राखीव असलेली जागा संगनमताने अंजूमन-ए-शियाते अली ट्रस्टला बहाल करणाऱ्या म्हाडाच्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०३-०८-२०१६) :**(१) माहे ऑगस्ट २०१४ मध्ये सेव्ह ओपन स्पेस या अशासकीय संस्थेकडून तक्रार प्राप्त झालेली आहे.

(२) दि. २०.०१.२०१५ रोजीच्या पत्र क्र. आर्च/एमबी/जेव्हीपीडी-विलेपार्ले (डब्ल्यू)/४४/१५ द्वारे सुधारित अभिन्यास सादर आहे.

त्यानुसार भूखंड क्र.३ व ६ मधील उपविभाजित भूखंड क्र. ३/१४ (३४) व ६/११(१०) हे सदर संबंधित बोहरा कम्युनिटी संस्थेच्या अभिनयासानुसारचे मोकळे भूखड (बगिचा) सुधारित अभिन्यासामध्ये दर्शविण्यात आलेले आहेत.

(३) दि. २५.०७.२०१३ रोजीचे आदेश हे भूखंड क्र.३ मधील मोकळ्या भूखंड ३/१४ (३४) करिता आहेत. आदेशामध्ये सदर भूखंड हा संस्थेच्या अभिन्यासामधील आवश्यक मोकळ्या जागेकरिता असल्याचा उल्लेख आहे.

(४) मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांच्या अहवालानुसार १९६२-६३ दरम्यान तत्कालीन अभिन्यासामधील भूखंड क्र. १, ३, ५ व ६ हे बोहरा कम्युनिटी या संस्थेस वाटप केलले असून १९६७ ते १९७७ पर्यंत सदर भूखंडाच्या किंमतीचा भरणा करण्यात आलेला आहे, सदरहू दोन मोकळ्या जागा (भूखंड क्र. ३/१४ व ६/११) चा अद्याप भाडेपट्टा करारनामा करण्यात आलेला नाही. तसेच या संदर्भात प्रकरण न्याय प्रविष्ट आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अणूशक्तीनगर, मुंबई येथे शवविच्छेदन केंद्र सुरु करण्याबाबत**

**(४) १९६२८ (११-०८-२०१५). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अणूशक्तीनगर, मुंबई येथे शवविच्छेदन केंद्र सुरु करण्याबाबतचे निवेदन दिनांक ०३ मार्च, २०१५ रोजी वा त्या सुमारास लोकप्रतिनिधींनी मा. सार्वजनिक आरोग्य मंत्री यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाच्या संदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत आणि याप्रकरणी कार्यवाही केव्हा करण्यात येणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-११-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जव्हार (जि.पालघर) तालुक्यात यशवंतनगर ते गोरवाडी रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(५) ३८०३३ (२०-०१-२०१६). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि.पालघर) तालुक्यात यशवंतनगर ते गोरवाडी रस्त्याची दुरुस्ती व डांबरीकरण न झाल्यामुळे रस्त्याची दुरवस्था झाली असून दिनांक २३ सप्टेंबर, २०१५ रोजी या रस्त्यावर मोटरसायकल अपघातात एक तरुणाचा मृत्यु झाल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्यासह बसस्थानक, गांधी चौक, संभाजी पथ, आझाद चौक रस्ता या रस्त्यांचीही दुरवस्था झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या रस्त्यांची पाहणी वा चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, उक्त परिसरातील रस्ते किती कालावधीत दुरुस्त करण्यात येणार आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१६) :**(१) हे खरे नाही.

दि. २३ सप्टेंबर, २०१५ रोजी या रस्त्यावर अपघात झाला नसून विजयस्तंभ ते साकी हॉटेल या रस्त्यावर मोटारसायकल अपघातात एका तरुणाचा मृत्यु झाला आहे.

यशवंतनगर ते गोरवाडी रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम पूर्ण झाले आहे.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

बस स्थानक, गांधी चौक, संभाजी पथ, आझाद चौक रस्ता या रस्त्यांच्या डांबरीकरणाची कामे पूर्ण झाले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ता.वसई, जि.पालघर मौ.वालईपाडा येथील खदाणीत तीन निष्पाप अल्पवयीन मुलांचा बुडून झालेला मृत्यू

**(६) ३९६६१ (२१-०४-२०१६). श्री.बळीराम सिरसकर (बाळापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नालासोपारा, संतोषभुवन येथे राहणाऱ्या ब्रिजेश विश्वकर्मा (१३) अशरफ जुबर (१४) व निरज विश्वकर्मा (१३) या तीन अल्पवयीन मुलांचा ता.वसई, जि.पालघर विरार पुर्वेकडील वालईपाडा येथील खदाणीत दिनांक २७ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास पोहताना बुडून मृत्यू झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर खदाणीत खोदकाम करण्यासाठी शासनाच्या महसुल विभागाने अथवा वसई-विरार शहर महानगरपालिकेने रितसर पवानगी दिली आहे काय,
(३) असल्यास, या घटनेची चौकशी करुन मुलांच्या मृत्यूस जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर गुन्हे दाखल करुन सदर प्रकरणी कार्यवाही करण्याची मागणी वसई-विरार शहर महानगरपालिकेचे नगरसेवक / गटनेते यांनी दिनांक १३ जुलै, २०१५ रोजी वा त्यासुमारास एका सविस्तर लेखी निवेदनाद्वारे मा.तहसलीदार, वसई यांच्याकडे केली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय
(५) असल्यास चौकशीअंती काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-१०-२०१६) :**(१) होय. हे खरे आहे.
(२) होय. जिल्हाधिकारी, ठाणे यांना मे. अमेया इंटरप्रायजेस यांना खादाणीत खोदकाम करण्यास परवानगी दिली होती.
(३) होय, हे खरे आहे.
(४) व (५) सदर प्रकरणी विरार पोलीस ठाणे येथे अ.मृ.र.क्र. ९४/२०१५. फौ.दं.प्र.सं. कलम १७४ अन्वये नोंद घेण्यात आली आहे. सदर मुले खदानीमधील पाण्यात खेळण्यासाठी उतरली असता, पाण्याचा खोलीचा अंदाज न आल्यामुळे त्यांचा बुडून मृत्यु झाल्याचे पोलीसांनी केलेल्या चौकशीत निष्पन्न झाले आहे. तसेच, पाण्यात बुडून मृत्यु झाल्याचे वैद्यकीय अधिकारी यांनी लेखी अभिप्राय दिला आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पत्रकारांना हक्काचे घर देण्याबाबत**

**(७) ३९८५३ (१७-०५-२०१६). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील कल्याण डोंबिवली महापालिका पत्रकार संघातर्फे आयोजीत करण्यात आलेल्या पत्रकार दिनाच्या कार्यक्रमामध्ये मा.ना. गृहनिर्माण मंत्री, श्री.प्रकाश मेहता यांनी पत्रकारांना हक्काचे घर देण्याबाबत आश्वासन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, पत्रकारांना हक्काचे घर देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१३-१०-२०१६) :**(१) दिनांक ०६ जानेवारी, २०१६ रोजी पत्रकार दिनानिमित्त महापालिका बिटवरील नियुक्त पत्रकारांनी आयाजित कार्यक्रमात मा.मंत्री (गृहनिर्माण) यांनी केलेल्या भाषणात कल्याण शहरात पत्रकारांच्या घरांसाठी सहकार्याची भूमिका सरकारची असेल यासाठी मुख्यमंत्री महोदयांच्या माध्यमातून सदरचा प्रश्न सोडविला जाईल, असे आश्वासन दिले होते. सदरच्या कार्यक्रमाचे अयोजन पत्रकार संघातर्फे करण्यात आले होते.

(२) (३) व (४) म्हाड (जमिनीची विल्हेवाट) नियम, १९८१ व म्हाड मिळकत व्यवस्थापन (गाळ्यांची विक्री, हस्तांतरण व अदलाबदल) विनियम, १९८१ मधील तरतूदीनुसार निरनिराळ्या प्रवर्गासाठी नियमानुसार असलेल्या आरक्षणामध्ये “पत्रकार” या प्रवर्गाकरिता २.५ टक्के सदनिका आरक्षित करण्यात येतात त्यानुसार जाहीरात प्रसिध्द करून सोडत काढण्यात येते.

---

**बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सफाई कर्मचा-यांना देण्यात येणा-या सुविधांबाबत**

**(८) ४०००८ (०३-०५-२०१६). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सफाई कर्मचा-यांच्या चौक्यांवर शौचालय, आराम करण्याची खोली, महिला कामगारांसाठी स्वतंत्र खोली, पिण्याचे स्वच्छ पाणी आदी सुविधा उपलब्ध करुन देण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाने २००७ मध्ये महापालिका दिले असतानाही अद्यापही या चौक्यांची दुरावस्था असल्याचे वेळोवेळी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सफाई कामगारांच्या एकूण कामगारांमध्ये ५० टक्के महिला कर्मचारी असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मधल्या काळात लोखंडी कंटेनरमध्ये सदर चौक्या थाटण्यात आल्या परंतु, सदरचे कंटेनरही गंजून गेले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, भल्या पहाटे या चौक्यांवर हजेरी लावून मुंबईला सुंदर बनविण्याचे काम करणा-या सफाई कर्मचा-यांना मुबलक अशा सुविधा देण्यासाठी शासनाद्वारे महापालिका प्रशासनाला आदेश देण्यात आले आहे काय,

(५) असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०९-२०१६)** :(१) सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या आदेशानुसार, बृहन्मुंबई महानगरपालिककेतील सफाई कामगारांसाठी सोयी-सुविधांनी युक्त शौचालय तसेच महिला कामगांरासाठी स्वतंत्र खोली असलेल्या लोखडी कंटेनर चौक्या तातडीने उभारण्यात आलेल्या आहेत.

सदर चौक्यांमध्ये स्वच्छ पाणी पुरविण्याकरिता वॉटर फिल्टर बसविण्यात आले आहेत. तसेच सदर चौक्यांच्या दुरूस्ती व देखभालीकरिता महापालिकेमार्फत कंत्राटदार नेमून डागडुजी करण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही. सफाई कामगारांच्या एकूण कामगारांमध्ये २३% महिला कर्मचारी आहेत.

(३) सदर लोखंडी कंटेनर चौक्यांच्या दुरूस्तीचे काम करण्यासाठीचे द्विवार्षिक कंत्राट सन २०१४ ते २०१६ या कालावधीकरिता महापालिकेमार्फत देण्यात आले आहे.

आतापर्यंत एकूण १४५ चौक्यांच्या दुरूस्तीचे काम पूर्ण झाले असून, उर्वरित चौक्यांच्या दुरूस्तीचे काम चालू आहे.

तसेच, आवश्यकतेनुसार पक्क्या चौक्यांची बांधणी व दुरूस्तीची कामे महापालिकेमार्फत विभाग पातळीवर केली जात आहेत.

(४) हे खरे नाही.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील सर्व महानगरपालिका, नगरपरिषदा यांनी शहरात लावलेल्या बेकायदा होर्डिंग निष्काषित करण्याबाबत

**(९) ४०९३७ (१६-०५-२०१६). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व महानगरपालिका, नगरपरिषदा यांनी शहरात लावलेल्या सर्व बेकायदा होर्डिग (जाहिराती फलक) निष्कासित करण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाने माहे जानेवारी २०१६ च्या दरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०९-२०१६)** :(१) हे खरे आहे.

मात्र सदरचे आदेश मा.उच्च न्यायालयाने दिनांक ३.८.२०१४, दिनांक ३०.०९.२०१६ व दिनांक २६.११.२०१५ व तदनंतर वेळोवेळी दिलेले आदेश आहेत.

(२) मा.न्यायालयाचे आदेशानुसार पुणे महानगरपालिकेकडून दिनांक १.१.२०१६ ते ३०.६.२०१६ अखरे होर्डींग, बोर्ड, बॅनर, फ्लेक्स, झेंडे, पोस्टर, किऑन्स व इतर असे एकूण १,३६,४४९ वर कारवाई करण्यात आली आहे. तसे प्रतिज्ञापत्र मा.उच्च न्यायालयात माहे फेब्रुवारी, २०१६ पर्यंत सादर केले असून माहे जून, अखेर पर्यंत केलेल्या कारवाईचा अहवाल मा.उच्च न्यायालयात सादर करण्यासाठी पुणे महानगरपालिकेमार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापूर शहरात घरफाळा कर कमी करण्याबाबत

**(१०) ४१००३ (१७-०५-२०१६). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्वाधिक घरफाळा कोल्हापूर महानगरपालिका प्रशासनाकडून आकारला जात असून एखाद्या ठिकाणी बांधकामाला परवानगी दिल्यानंतर संबंधित माहिती घरफाळा विभागाकडे पाठविल्यावर एक वर्षानंतर घरफाळा लागू करावा असा नियम बंधनकारक असतांनाही कोल्हापूर शहरात वीस हजारांहून जास्त मिळकतींना गेली १५ वर्षे घरफाळाच लागू झाला नसल्याचे माहे जाने, २०१६ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिका प्रशासन प्रत्येक वर्षी घरफाळा निवासी ५८.२५ टक्के व अनिवासी ७१.५० टक्के असा चुकीच्या धोरणाने आकारला जात असल्याने त्याचा फटका शहरवासियांना बसत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वेळेत कर न भरला गेल्यास नागरिकांना वर्षाला २४ टक्के दंड व्याज आकारला जातो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, घरफाळा कर कमी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१६)** :(१) हे खरे नाही.

* नवीन मिळकती शोधून अशा मिळकतींना कर आकारणी करणेसाठी स्वतंत्र कर्मचारी वर्ग आहे. या कर्मचाऱ्यांमार्फत सर्व्हे करुन दि. ३१ मार्च, २०१६ अखेर आकरणी न झालेल्या मिळकतींना कर आकारणी केलेली आहे.

* महानगरपालिकेचा रिव्हीजन सर्व्हे यापूर्वी सन २००४ मध्ये झालेला आहे. जीआयएस बेस सर्व्हे करण्याचे कार्यवाही महानगरपालिका करत असून या सर्व्हेमध्ये मिळकत कर लागू न झालेले सर्वेच मिळकतींना कर आकाणी करणेत येत आहे.

(२) हे खरे नाही.

* महानगरपालिकेने सन २०१२ पासून भांडवली मुल्यावर कर आकारणी प्रणाली स्विकारलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील नियम क्र. ९९ नुसार कराचे दर निश्चित केलेले आहेत.

* निवासी / अनिवासी मालक वापरातील मिळकतींना भांडवली मुल्याच्या ०.२५ टक्के व भाडे करारावरील मिळकतींना भांडवली मुल्यांच्या ०.५० टक्के कर आकारणी केली जाते.

(३) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कराधान नियम क्र. ४१ नुसार मालमत्ता कराच्या थकीत रक्कमेवर दर महा दोन टक्के इतकी दंड/शास्ती लावून कराची वसुली करणेची कार्यवाही सुरु आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील जिल्हा मध्यवर्ती कारागृहामध्ये क्षमतेपेक्षा जास्त कैदी ठेवण्यात येत असल्याबाबत.**

**(११) ४१५८८ (१७-०५-२०१६). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: सांगली, भायखळा (मुंबई), ठाणे, कल्याण, चंद्रपूर, यवतमाळ, वर्धा, सोलापूर, सातारा, बीड, नांदेड, अहमदनगर इत्यादी ठिकाणच्या जिल्हा मध्यवर्ती कारागृहामध्ये क्षमतेपेक्षा जास्त कैदी ठेवण्यात येत असून कारागृहाची तपासणी अपर पोलिस महासंचालक व कारागृह महानिरीक्षक यांनी केली असता यामध्ये सुरक्षेच्या दृष्टीने गंभीर त्रुटी आढळल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच पुणे येथील येरवडा कारागृहात २३२३ कैदी ठेवण्याची क्षमता असताना तेथे ६००० कैदी ठेवण्यात आल्याचा अहवाल मा. प्रधान जिल्हा न्यायाधीय, पुणे यांनी मा. उच्च न्यायालय यांना सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच मुंबईतील ऑर्थर रोड कारागृहाबाबतही न्यायालयाने दिनांक १५ ऑक्टोंबर, २०१५ रोजी अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०८-२०१६) :**(१) नाही, सदरची बाब ही अंशत: खरी असून फक्त ठाणे मध्यवर्ती कारागृह व कल्याण जिल्हा कारागृह येथे बंदी क्षमतेपेक्षा जास्त बंदी बंदीस्त आहेत. परंतु तेथे सुरक्षा विषयक गंभीर त्रुटी आढळून आलेल्या नाहीत.

(२) हे अंशत: खरे आहे.

येरवडा मध्यवर्ती कारागृहातील अधिकृत बंदीक्षमता २३२३ असून सद्यस्थितीमध्ये सरासरी ३८०० ते ४००० बंदी बंदीस्त आहेत.

(३) होय.

दि.२७.१०.२०१५ रोजी सन्मा.न्यायाधीश श्री.अे.अे.खान साहेब यांनी या कारागृहास प्रत्यक्ष भेट दिलेली असून या कारागृहाचा संबंधित अहवाल सन्मा.न्यायालयास सादर करण्यात आलेला आहे.

(४) खालीलप्रमाणे कार्यवाही केलेली आहे.

कारागृहात दाखल असलेल्या बंद्यांना सन्मा.न्यायालयाकडून जातमुचलकीची रक्कम भरणा करण्याचे आदेश झालेल्या किरकोळ गुन्ह्यातील बंद्यांना आर्थिक परिस्थितीमुळे रक्कम भरणा करुन कारागृहातुन मुक्त करण्यात येते.

१. ठाणे मध्यवर्ती कारागृह येथे २५ बंदीक्षमतेच जिल्हा खुले कारागृह सुरु करण्यात आले आहे.

२. कारागृहाची बंदीक्षमता वाढविण्याकरिता २ बॅरेकचे नव्याने बांधकाम सुरु करण्यात आले आहे.

३. व्हिडीओ कॉन्फरंसिंगमार्फत जास्तीत जास्त बंद्यांना सन्मा.न्यायलायात हजर करण्यात येवून बंद्याचे केसेस निकाली काढण्याकरिता प्रयत्न करण्यात येत आहे.

४. येरवडा मध्यवर्ती कारागृहामध्ये नवीन ८ बॅरेक बांधकामास सुरुवात करण्यात आलेली आहे.

५. महिला कारागृहातील बंद्यांकरिता पार्टीशन असणारे स्नानगृहे, स्वच्छतागृहे इ. दुरुस्ती व नुतनीकरणासाठी सार्वजनिक बांधकाम विभागास निधी हस्तांतरीत केला असून सदरचे काम प्रगतीपथावर आहे.

६. न्यायाधीन बंद्यांना त्रैमासिक आढावा घेऊन अशा बंद्यांना कारागृहातुन मुक्ततेबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येते. तसेच बंदी दाखल असलेल्या कलमामध्ये कमाल शिक्षेच्या १/४ कालावधी व्यतित केलेल्या बंद्यांची प्रकरणे सदर न्यायाधीन बंदी पुनर्विलोकन समितीसमोर सादर केली जातात. कारागृहात दाखल न्यायाधीन बंद्यांना पॅनलवरील वकिलाची नेमणूक करुन कायदेशीर मदत देण्यात येते.

७. कारागृहात प्लि बार्गेनिंग शिबीर आयोजित करण्यात येतात.

८. नवीन कारागृह निर्मिती, अतिरिक्त जागा प्राप्त करणे तसेच नव्याने मंजुरीप्राप्त कारागृह कार्यान्वित करणेबाबत आवश्यक कार्यवाही चालु आहे.

९. सात नवीन खुले कारागृह सुरु करण्यात आली आहेत. त्यापैकी एक महिला खुले कारागृह आहे.

१०. पोलीस पथक उपलब्धता/व्हिडीओ कॉन्फरंसिंगद्वारे केसची सुनावणी याकरिता संबंधित पोलीस/न्यायालय/शासन या विभागांकडे पाठपुरावा चालु आहे.

११. न्यायाधीन बंद्यांना संबंधत न्यायलायाची परवानगी घेऊन नजिकच्या कारागृहात वर्ग करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसई विरार महापालिकेत २९ गावांचा समाविष्ट करण्याचा घेतलेला निर्णय**

**(१२) ४१६९५ (१३-०५-२०१६). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई- विरार महापालिकेत २९ गावांचा समावेश करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २९ गावांच्या विकासासंदर्भात योग्य निर्णय होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-१०-२०१६) :**(१), (२) व (३) सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ असून, २९ गावे वसई विरार शहर महानगरपालिकेच्या हद्दीत समाविष्ट करण्याचा शासनाचा निर्णय मा.उच्च न्यायालयास शपथ पत्राद्वारे अवगत करण्यात आला आहे.

---

**कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे)महापालिका हद्दीतील शहरी गरिबांसाठी बांधण्यात आलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(१३) ४१७३३ (१३-०५-२०१६). श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण -डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिका हद्दीतील शहरी गरिबांसाठी बांधण्यात आलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार होऊन योजनेतील लाभार्थी निश्चित न करता त्यांना घरे देण्यात आल्यामुळे सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती योजनेतील पात्र लाभार्थ्यांची सर्व मूळ कागदपत्रे तपासून किती लाभार्थी पात्र व किती अपात्र झाले आहेत,

(४) तसेच ज्या लाभार्थींनी खोटी कागदपत्रे जमा करून घरे बळकावण्याचा प्रयत्न केला अशा किती अपात्र लाभार्थीवर व त्यांना पाठीशी घालणाऱ्या अधिका-यांवर गुन्हे दाखल केले आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२०-०९-२०१६) :**(१) हे खरे आहे.

केंद्र पुरस्कृत जवाहर नेहरू नागरी पुनरुत्थान अभियानांतर्गत शहरी गरीबांना मुलभूत गरजा पुरविणे (BSUP) या कार्यक्रमांतर्गत कल्याण डोंबिवली महानगरपालिकेस एकूण १३४६९ घरकुलांच्या ४ प्रकल्पांना केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितने (CSMC) दि. ६.१२.२००७ रोजी मंजूर दिली आहे. कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने केंद्र शासनास सादर केलेल्या डीपीआर (DPR) नुसार ४६३२ घरकुले सिमित/रद्द करुन सुधारीत मंजूरीनुसार एकूण ८८८८ इतकी घरकुले बांधण्यात येणार असून त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| प्रकल्प | मंजूर घरकुले | सिमित करुन सुधारित घरकुलांची संख्या |
|---|---|---|
| १ | ८१४२ | ४५९१ |
| २ | २३७६ | १८४२ |
| ३ | ११९५ | ०० |
| ४ | १७५६ | १७५६ |
| एकूण | १३४६९ | ८१८८ |

याबाबत मा.उच्च न्यायालयात दाखल केलेली याचिका निकाली काढण्यात आली असून तदनंतर याचिकाकर्त्याने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेली एस.एलपी.(क्री) ५०४/२०१५, देखील दि.१.४.२०१६ रोजीच्या आदेशान्वये मा.सर्वोच्च न्यायालयाने अतीमत: निकाली काढली आहे.

(२), (३), (४) व (५) प्रस्तुत प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या शपथपत्रास अनुसरुन पात्र करण्यात आलेल्या लाभार्थीबाबत लाचलूचपत प्रतिबंध विभागामार्फत चौकशी सुरु असून बाजारपेठ पोलस स्टेशन, कल्याण येथे गुन्हा क्र. ६०/२०१६ अन्वये ५ व्यक्तीविरुध्द दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पुढील तपास सुरु आहे.

---

## किवळे गावठाण, कोतवालनगर, मकाई चौक आदि ठिकाणी जाण्यासाठी येथील अर्धा किलोमीटरचा रस्ता करण्याबाबत

**(१४) ४१९८३ (१३-०५-२०१६). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हा - हवेली तालुक्यातील किवळेतील सांडभोर वसाहत ते मकाई चौक अंतर अवघे अर्धा किलोमीटर आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने १९ वर्षानंतरही रस्ताच केला नसल्याचे सुमारे चारशे घरातील रहिवाशांना मकाई चौकात जाण्यासाठी रावेत मार्गे तीन किलोमीटरचा वळसा घालून जावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, किवळे गावठाण, कोतवालनगर, मकाई चौक आदि ठिकाणी जाण्यासाठी येथील अर्धा किलोमीटरचा रस्ता करावा अशी येथील रहिवाशांची मागणी आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर रस्ता बांधकामाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०९-२०१६) :**(१) होय.

सांडभोर वसाहत ते मुकाई चौक Shortest Aerial Distance शेतकऱ्यांच्या खाजगी जागेतून ०.५०० किलोमिटर इतके आहे.

(२) सांडभोर वसाहती मधील रहिवाश्यांना मुकाई चौकापर्यंत जाणेकरीता बेंगलोर-मुंबई महामार्गाने २.२०० किलोमीटर अंतर जावे लागते.
(३) होय, हे खरे आहे.
(४) सदरचा रस्ता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास आराखड्यात नसल्याने रस्ता बांधकामाबाबत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत कार्यवाही करणे शक्य झाले नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिवाजी पार्क (दादर) स्मशानभूमीतील इलेक्ट्रिकल दहन इमारत दुरुस्तीबाबत**

**(१५) ४२११६ (०७-०५-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेच्या जी उत्तर दादर विभागात शिवाजी पार्क येथे असलेल्या शिवाजी पार्क स्मशानभूमीतील इलेक्ट्रिकल दहन इमारत धोकादायक असल्यामुळे तेथील इलेक्ट्रिक शेगडीचा दहनासाठी वापर करण्यात येत नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर इमारतीच्या दुरुस्तीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०९-२०१६) :**(१) हे खरे नाही. शिवाजी पार्क येथे असलेल्या स्मशानभूमीतील इलेक्ट्रिक दहन इमारतीमधील इलेक्ट्रिक शेगड्यांचा मुतदेह दहनासाठी माहे जानेवारी, २०१६ मध्ये वापर होत होता व सद्य:स्थितीत देखील वापर सुरू आहे.
(२) विद्युत दाहिनीच्या तीनही भट्टया कार्यरत ठेवून सदर इमारतीचे मोठ्या प्रमाणातील संरचनात्मक दुरूस्तीचे काम ऑक्टोबर, २०१५ पासून सुरू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील दहिसर गाव येथील खेळाच्या मैदानाचा विस्ताराकरीता**
**आरक्षित भुखंड खेरदी करण्याचा प्रस्ताव**

**(१६) ४२१५४ (१७-०५-२०१६). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील दहिसर गाव येथील खेळाच्या मैदानाच्या विस्ताराकरीता आरक्षित भुखंड खेरदी करण्याचा प्रस्तावास विरोध असतानाही सदर प्रस्ताव महानगरपालिकेने विना चर्चा मंजूर केला असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने चौकशी करुन सदर प्रस्तावाबाबत फेरविचार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१६) :**(१) मौजे दहिसर न. भू. क्र. १२१७ ई या विस्तरारित खेळाच्या मैदानासाठी आरक्षित भूखंडाबाबत प्राप्त झालेल्या खरेदी सूचनेस दिनांक २९.१२.२०१५ च्या सुधार समितीमध्ये ठराव क्र. १३६ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे. त्यानुसार महापालिकेच्या दिनांक ०२.०१.२०१६ रोजीच्या सभेमध्ये ठराव क्रमांक १२२६ अन्वये प्रस्ताव मंजुर झालेला आहे.

सदर प्रस्ताव भुसंपादनाच्या पुढील कार्यवाहीकरिता जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करण्यात आलेला आहे.

सदर प्रस्तावारील सुधारीत खर्चाबाबत सुधार समितीच्या दिनांक १६.०२.२०१६ रोजीच्या ठराव क्रमांक १७० अन्वये मंजुरी घेण्यात आलेली आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पंढरपूर तालुक्यातील (जि.सोलापूर) अतिक्रमण हटविणेबाबत

**(१७) ४२४४५ (१७-०५-२०१६). श्री.सिध्दराम म्हेत्रे (अक्कलकोट), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर तालुक्यात यात्रा दरम्यान नगरपालिका, पोलिसांकडून अतिक्रमण हटवले जाते व यात्रा संपली की पुन्हा अतिक्रमण करीत असल्याने व्यापा-या मधून संताप व्यक्त केला जात असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहरी भागात नागरीकांना चालण्यासाठी पदपथ तयार करण्यात आले आहेत, त्यावर पुन्हा अतिक्रमणे वाढली असल्याचे निदर्शनास आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी अतिक्रमण दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१६) :**(१) हे खरे नाही.

शहरातील अतिक्रमण काढणेसाठीयात्रे व्यतिरिक्त इतर कालावधीत नियमितपणे अतिक्रमण निर्मुलनाची कारवाई केली जाते. अतिक्रमण निर्मुलनासाठी नगरपरिषदेची स्वतंत्र यंत्रणा कार्यरत आहे काही ठिकाणांवर पदपथाचे मागील व्यापाऱ्याकडूनच अतिक्रमण केले जाते व ते वेळोवेळी नगरपरिषदेचे यंत्रणेमार्फत हटविले जाते.
(२) व (३) हे खरे नाही.

यात्रा कालावधीमध्ये परगावाहून व्यापारी येतात व ते पदपथावर अतिक्रमण करणेचा प्रयत्न करतात त्यासाठी त्यांनाही हटविणेची कारवाई नगरपालिकेकडून वेळोवेळी करण्यात येते.

नगरपरिषदेमार्फत पंढरपुर शहरात एकूण १६ ठिकाणी दुकान केंद्र असून ६४९ दुकान गाळे कायमस्वरुपी व्यापाऱ्यांना उपलब्ध करुन दिलेले आहेत. तसेच नियमितपणे अतिक्रमण निर्मुलनाची कारवाई केली जाते व अतिक्रमणे स्वतंत्र यंत्रणेमार्फत हटविली जातात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महापालिका, नगरपालिका व ग्रामीण भागातील आरक्षित जमीन**
**दहा वर्षाच्या काळात संपादीत करण्याबाबत**

**(१८) ४२८०८ (२०-०४-२०१६). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महापालिका, नगरपालिका व ग्रामीण भागातील आरक्षित जमीन दहा वर्षाच्या काळात संपादीत करणे व शासकीय यंत्रणांना शक्य न झाल्यास त्या जमिनीवरील आरक्षण रद्द करण्याची संस्थांची एक वर्षाची मुदत दोन वर्षापर्यंत वाढविण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयाचा अध्यादेश जारी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१६) :**(१) ते (३) प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२७ मध्ये विकास योजनेमध्ये आरक्षित /निर्देशित असलेली जमीन दहा वर्षाचे कालावधीत संपादन न झाल्यास जमीन मालकाने नियोजन प्राधिकरणावर नोटीस बजावणेची तरतूद आहे. सदर नोटीस बजावले नंतर नियोजन प्राधिकरणाने १२ महिन्याचे कालावधीमध्ये कलम १२७ मध्ये नमूद असलेली भूसंपदान कार्यवाही न केल्यास आरक्षित /निर्देशित असलेली जमीन आरक्षणामधून व्यपगत होणेची तरतूद आहे. सदर १२ महिन्याचा कालावधी २४ महिने इतका वाढविणेसाठी शासनाने सदर कलम १२७ मध्ये सुधारणा केलेल्या आहेत. याबाबतचा अध्यादेश आलेला होता. सन २०१५ च्या हिवाळी अधिवेशनामध्ये विधीमंडळाचे मान्यतेने त्यानुसार अधिनियमामध्ये दुरुस्ती झालेली आहे.

---

**पुणे महानगरपालिकेच्या वतिने पाणी शुध्द करुन कालव्यात सोडण्याबाबत**

**(१९) ४२८४५ (१७-०५-२०१६). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेच्या वतीने सांडपाण्यावर प्रक्रिया करुन जुन्या मुठा उजव्या कालव्यातून पूर्व हवेली मधील गावांना पाणी पुरवठा दिनांक २२ जाने, २०१६ पासुन करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जलसंपदा विभागाने पुणे महानगरपालिकेशी सन १९९७ मध्ये करार करुन हवेली, दौंड, इंदापुर तालुक्यामधील शेतकऱ्यांना सहा टीएमसी सांडपाण्यावर प्रक्रिया करुन ते पाणी जुन्या मुठा उजव्या कालव्याद्वारे शेतीला पुरवावे असा करार केला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, १९ वर्षानंतर शेतीकरता कालव्याद्वारे सोडण्यात येत असलेले दुर्गंधीयुक्त व कुठलीही प्रक्रीया न केलेले पाण्यामुळे कालव्यालगतच्या गावामध्ये पाणी पुरवठा योजनांवर त्याचा परिणाम होऊन नागरीकांच्या आरोग्याच्या तक्रारी वाढल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पुणे महानगरपालिकेच्या वतीने पाणी शुध्द करुन कालव्यात सोडण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०९-२०१६) :**(१) पुणे महानगरपालिकेमार्फत पाटबंधारे विभागाकडील मुठा उजव्या कालव्यामध्ये सिंचनासाठी उपलब्ध करुन द्यावयाच्या पाण्याची मुंढवा जॅकवेलची योजना ऑक्टोबर, २०१५ पासून कार्यान्वित करण्यात आली आहे.
(२) होय.

पुणे महानगरपालिका व खडकवासला पाटंबंधारे विभाग यांचेमध्ये खडकवासला धरणमधून पुणे महानगनरलिकेस उपलब्ध करुन द्यावयाच्या पाण्याचे अनुषंगाने करारनामा करणेत आला आहे. सदर करारनाम्यातील अटीनुसार ११.५० टी.एम.सी. पाणीपुरवठा करताना ६.५० टी.एम.सी. एवढे प्रक्रिया कलेले सांडपाणी सिंचनासाठी मुठा उजव्या कालव्यामध्ये उपलब्ध करुन देणे आहे.
(३) पुणे शहरामध्ये सध्या सुमारे ७४४ एम.एल.डी. इतके मैलापाणी निर्माण होते. त्यापैकी सुमारे ४०० एम.एल.डी. एवढ्या मैलापाण्यावर सध्या प्रक्रिया करुन नदीमध्ये सोडण्यात येते.

या व्यतिरिक्त मुळा-मुठा नदीमध्ये पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीबाहेरील गावांतील १०० एम.एल.डी. मैलापाण्यावर प्रक्रिया न होता नदीत मिसळले जाते.

मुंढवा खराडी बंधारा येथे मुळे-मुठा नदीमधील हे प्रक्रिया केलेले (सुमारे ४०० एमएलडी) नदीत मिळसलेले पाणी एकत्रीतणे अडवून मुंढवा जॅकवेल व पंपहाऊस द्वारे हे पाणी उचलून दाबनलिकेने मुठा उजव्या कालव्यात सिंचनासाठी उपलब्ध करुन देणेत येते. सदर पाणी सिंचना योग्य असून सिंचनासाठीच्या पाण्याच्या मानकांची पुर्तता करणारे आहे.

तर जिल्हा परिषद, पुणे यांचेकडील दिनांक ४.३.२०१६ च्या अहवालानुसार फुरसुंगी आणि शेवाळेवाडी भागातील सार्वजनिक वापराच्या विहिरीतील पाण्याचे नमुने तपासले असता पाणी दुषित आढळून आले नाही. तसेच या भागात जलजन्य आजाराचे रुग्ण आढळून आले नाहीत.

(४) पुणे शहरामध्ये निर्माण होणाऱ्या १००% मैलापाण्यावर प्रक्रिया होणेसाठी पुणे महानगरपनालिकेमार्फत सन २०२७ ची लोकसंख्या विचारात घेऊन सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेत आला आहे. सदर रुपये ९९०.२६ कोटीचा अहलवा केंद्र शासनाकडील एनआरसीडी व जायका मार्फत मान्य झाला असून यामध्ये ३९६ एम.एल.डी. क्षमतेची मैलापाणी शुध्दीकरण केंद्र उभारणेचा प्रस्ताव आहे. प्रस्तुत योजना पूर्ण करण्याचा कालावधी ६ वर्षाचा असून ३१ जानेवारी, २०२२ पर्यंत हि योजना पूर्ण करावयाची आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील झोपडपट्टयांना मालमत्ता कर लावण्याचा घेतलेला निर्णय**

**(२०) ४४१२७ (०५-०५-२०१६). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील झोपडपट्टयांना माहे एप्रिल २०१६ पासून मालमत्ता कर लावण्याचा निर्णय मुंबई महानगरपालिकेने माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या सुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) मालमत्ता कर घेतलेल्या झोपड्यांना इतर सुविधा देऊन त्या झोपड्या नियमित करण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१६) :**(१) हे खरे नाही. तथापि, मुंबईतील झोपडपट्टयांवर भांडवली मूल्याऐवजी “ठोक दराने” मालमत्ता कराची आकारणी दिनांक ०१.०४.२०१६ पासून करण्याकरिता तसेच “झोपडपट्टी या संज्ञेची स्पष्ट व्याख्या अंतर्भूत करण्याकरिता मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ मध्ये कलम १४० बी चा अंतर्भाव करून सुधारणा करण्यासाठी विधी समिती/महानगरपालिका यांच्या मंजुरी करिता बृहन्मुंबई प्रशासनामार्फत मसुदापत्र सादर करण्यात आले आहे.
(२) (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### भांडुप (मुंबई) पश्चिम परिसरातील ९० फुटी रस्त्यावरील अनधिकृत स्टॉलबाबत

**(२१) ४५१८८ (०५-०५-२०१६). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भांडुप (मुंबई) पश्चिम परिसरातील ९० फुटी रस्त्यावर दिवसागणीक अनधिकृत दुकाने व पदार्थाची विक्री करणारे स्टॉल यांची गर्दी वाढत असल्याबाबतच्या तक्रारी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मुंबई महनगरपालिकेचे विभाग अधिकारी व आयुक्त तसेच शासनाकडे माहे जानेवारी, २०१६ व तत्पूर्वी अनेक वेळी लेखी निवेदनाद्वारे केल्या आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भांडुप (मुंबई) पश्चिम परिसरातील ९० फुटी रस्त्यावर अनधिकृत स्टॉल काढुन टाकण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०९-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने, दिनांक २५.११. २०१५ रोजी गाढव नाका, भांडुप (पश्चिम) येथे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत अतिक्रमण निर्मुलनाची कारवाई करण्यात आली आहे.

तसेच, दिनांक ०१.०१.२०१६ पासून फेरीवाल्यांवर महापालिकेमार्फत निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पालघर नगरपालिका क्षेत्रातील पालिकेच्या भगिनी शाळेसमोरील उद्यान विकसीत करण्याबाबत

**(२२) ४५२२५ (१७-०५-२०१६). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर नगरपालिका क्षेत्रातील पालिकेच्या मालकीच्या भगिनी शाळेसमोरील उद्यान विकासाचे काम दिनांक २२ ऑगस्ट, २०१४ रोजी एका पुण्यातील ठेकेदाराला देण्यात आले असून सदर कामाला दिड वर्ष होवूनही अद्याप उद्यान विकासाच्या कामाला सुरुवात करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर काम रखडविणाऱ्या ठेकेदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०९-२०१६) :**(१) कार्यादेश देऊनही कामास सुरुवात न केल्याने नगरपरिषदेने ती निविदा प्रक्रिया रद्द करुन नव्याने ई निविदा प्रक्रिया राबविण्यास मंजूरी दिली आहे.

(२) संबंधित ठैकेदाराची कामाची सुरक्षा अनामत रक्कम राखुन ठेवण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अंशकालीन कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सरळ सेवेने समाविष्ट करण्याबाबत**

**(२३) ४५३९९ (१७-०५-२०१६). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अंशकालीन कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सरळ सेवेने समाविष्ट करण्यात यावे अशी मागणी अंशकालीन कर्मचारी संघटनेने दिनांक १२ मे, २०१५ रोजी मा.मुख्यमंत्री यांना प्रत्यक्ष भेटून केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-१०-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) दिनांक ०७.०४.२०१६ रोजी अंशकालीन उमेदवारांच्या विविध मागण्यांच्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यानुसार अंशकालीन कर्मचाऱ्यांचा DATA-BASE तयार करण्यात येत असून, शासनातील गट-क संवर्गातील रिक्त पदांची माहिती संकलीत करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे येथील नामदेववाडी परिसरातील महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र आणि सोनसाखळी हिसकावण्याची घटना घडल्याबाबत**

**(२४) ४५८१७ (२०-०५-२०१६). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील नामदेववाडी परिसरातील महर्षी कर्वे रोडवर अज्ञात बाईकस्वारांनी महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र आणि सोनसाखळी हिसकावण्याची घटना दिनांक १ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत संबंधित महिलेने नौपाडा पोलीस ठाणे, जि.ठाणे येथे तक्रार केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधित महिलेचा ऐवज मिळण्याबाबत तसेच भविष्यात अशा घटना घडू नये म्हणून शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१६) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) ठाणे पोलीस आयुक्तालयातील नौपाडा पोलीस स्टेशनच्या हद्दीत सोन्याचे मंगळसूत्र व चैन जबरीने खेचून झालेल्या चोरी प्रकरणी दि. ३०.११.२०१६ रोजी गुन्हा दाखल केला आहे.

यास्तव, अशा प्रकारच्या घटना घनू नयेत म्हणून परिमंडळ स्थरावर चैन स्नॅचिंग पथक नेमलेले आहेत. तसेच गर्दीचे ठिकाणी बाजारपेठ, शाळा व कॉलेजच्या ठिकाणी साध्यावेशातील पोलीस हे पेट्रोलिंग करत असतात. पोलीस स्टेशन स्तरावर बिट मार्शल पेट्रोलिंग, मोबाईल पेट्रोलिंग नेमूण अशा प्रकारच्या घटना घड्ड नयेत म्हणून पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंग करीत आहेत.

तसेच प्रत्येक पोलीस स्टेशन हद्दीत कोंबीग ऑपरेशन व नाकाबंदीचे आयोजन केले जाते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिरोळ नगरपरिषदेची स्थापना होणेबाबत

**(२५) ४६३०४ (०७-०५-२०१६). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिरोळ नगरपरिषदेची (जि.कोल्हापूर) अधिसूचना जाहिर होऊन तांत्रिक मुद्यामुळे अद्याप नगरपरिषद होण्यात अडथळे येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तसेच सध्या अस्तित्वात असणाऱ्या ग्रामपंचायतीच्या गावठाण हद्दवाढीचा प्रस्तावही शासनाकडे पडून आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यामुळे शिरोळ शहरातील वाढीव उपनगरांसह १८०० कुटुंबाना शासनाला शेतसारा व ग्रामपंचायतील घरफाळा असा दुहेरी कर अनेक वर्षे भरावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०९-२०१६) :**(१) व (२) दि.६/४/२०१५ रोजी शिरोळ येथे नगरपरिषदेची स्थापना करण्याची प्राथमिक उध्दोषणा आक्षेप व हरकतीसाठी प्रसिध्द करण्यात आली आहे.
(३) व (४) सद्य:स्थितीतील नियमानूसार कर आकारणी होत असून नगरपरिषदेच्या स्थापनेबाबत आक्षेप/ हरकती बाबत अहवाल व अधिनियमातील तरतूदी नसुार माहिती जिल्हाधिकारी कोल्हापूर यांचे कडून प्राप्त करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहरातील विविध भागांमध्ये उभारण्यात आलेल्या आय टी पार्क मधील कंपन्यांनी लावलेल्या नाम फलकांची फी महानगरपालिका वसूल करत नसल्याबाबत

**(२६) ४६४४१ (१६-०५-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील विविध भागांमध्ये उभारण्यात आलेल्या आय टी पार्क मधील कंपन्यांनी लावलेल्या नाम फलकांची फी महानगरपालिका वसूल करत नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे महानगरपालिकेचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाल्याचा ठपका शासनाच्या लेखा परीक्षणामध्ये ठेवण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील कलम ३१३ अन्वये महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये कुठलाही कारखाना, कार्यशाळा उभारण्यासाठी महानगरपालिका आयुक्तांची परवानगी घेणे बंधनकारक आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय तसेच पुणे शहरातील विविध भागांमध्ये उभारण्यात आलेल्या आय टी पार्क मधील कंपन्यांनी लावलेल्या नाम फलकांची फी वसुलीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०९-२०१६) :**(१) हे खरे नाही.

पुणे शहरातील क्षेत्रिय कार्यालयाकडील प्राप्त अहवालानुसार आय.टी.कंपन्यानी लावलेल्या नामफलकापोटी सन २०१६-२०१७ मध्ये रुपये १६,०३,६८५/- इतकी रक्कम वसुल करण्यात आली आहे.
(२) हेखरे नाही.

शासनाच्या लेखापरिक्षणामध्ये आय.टी.पार्क मधील नामफलका बाबत ठपका ठेवण्यात आल्याचे निदर्शनास आले नाही.
(३) हे खरे आहे.
(४) जाहिरात व फलक नियंत्रण नियमावली २००३ नुसार विहित कागदपत्राची पुर्तता करुन नामफलक शुल्क वसूली करण्याची कार्यवाही पुणे महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील पोलीस कर्मचा-यांना पोलीस उपनिरीक्षक पदावर कायमस्वरुपी बढती देणेबाबत**

**(२७) ४७४२८ (१७-०५-२०१६). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), अ‍ॅड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील १९०७ पोलीस कर्मचारी, पोलीस उपनिरीक्षक पदाची परिक्षा उत्तीर्ण झालेले असतानाही सदर कर्मचा-यांना कायमस्वरुपी बढती देण्याऐवजी त्यांना दर अकरा महिन्यांची पदोन्नती देण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या दूस-या आठवड्यात निदर्शनास आलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पोलीस दलातील उक्त कर्मचा-यांना कायमस्वरुपी बढती देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-११-२०१६) :**(१) होय.

(२) प्रस्तुत प्रकरण मा.उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ असल्यामुळे १९०७ पोलीस कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी बढती देण्याबाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भांडूप (प) येथील मौजे कांजूर येथील केशव सृष्टी इमारतीत ग्रंथालयासाठी महानगरपालिकेने मंजूर केलेली जागा मिळण्याबाबत**

**(२८) ४७४५० (१६-०५-२०१६). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भांडूप (प) येथील एल.बी.एस. मार्गावरील एस विभागातील सिटीएस ४०७/क मौजे कांजूर येथील केशव सृष्टी इमारतीत ग्रंथालयासाठी महानगरपालिकेने मंजूर केलेली जागा मिळावी अशी मागणी आयुक्त ,बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडे स्थानिक लोकप्रतिनिधिंनी दिनांक १३ जानेवारी, २०१६ मध्ये वा तत्पूर्वी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०९-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) व (३) सार्वजनिक उद्दिष्टांसाठी राखीव असलेल्या महानगरपालिकेच्या जागेवरील बांधीव इमारती काळजीवाहू तत्वावर परिरक्षण आणि व्यवस्थापनाकरिता सार्वजनिक संस्थांना वाटप करण्यासंबंधीच्या धोरणास सुधार समिती/महानगरपालिकेची मंजुरी प्राप्त करणे आवश्यक आहे.

सदर धोरणास सुधार समिती/ महानगरपालिकेची मंजुरी प्राप्त करण्याची कार्यवाही सुरू आहे. सदर मंजुरी प्राप्त झाल्यानंतर मंजुर धोरणानुसार वर्तमानपत्रात जाहिर निविदा मागवून पात्र संस्थेला ग्रंथालयाचे वाटप करण्यात येईल.

---

**मुंबई उपनगरातील अंधेरी (प) येथील गिल्बर्ट हिल चे हेरीटेज १ मध्ये समाविष्ट करुन संवर्धन करणेबाबत**

**(२९) ४७४८३ (१७-०५-२०१६). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील अंधेरी (प) येथील गिल्बर्ट हिल ही ६.५ कोटी वर्ष जूनी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर हिल चे संवर्धन करण्याकरिता हेरीटेज १ मध्ये समावेश करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी निवेदन दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनावर कार्यवाही करण्यात आलेली आहे,

(४) असल्यास, सदर हिलचा समावेश हेरीटेज १ मध्ये करून संवर्धन करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, याबाबत विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-१०-२०१६)** :(१) याबाबतीत शासनाकडून निश्चित अनुमान काढता येणार नाही. तथापि सदर गिल्बर्ट हिल ६.५ कोटी वर्ष जुनी असल्याबाबत इंटरनेटवरील काही लेखांमध्ये उल्लेख आहे.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे अशी निवेदने प्राप्त झालेली आहेत.
(३) शासनाने दिनांक २.२.२००८ रोजीच्या अधिसूचनेन्वये गिल्बर्ट हिलचा समावेश हेरिटेज श्रेणी-२ अ मध्ये केलेला आहे.
(४) व (५) बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक ३१.७.२०१२ रोजी प्रारुप हेरिटेज यादी नागरीकांच्या सूचना हरकतीसाठी प्रसिध्द केलेली आहे. प्रारुप हेरिटेज यादीवर प्राप्त सूचना/हरकतीसंदर्भात बृहन्मुंबई महानगरपालिकेस अहवाल सादर करणेसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने माजी मुख्य सचिव श्री.दिनेश अफझलपूरकर यांचे अध्यक्षतेखाली पुनर्विलोकन समिती स्थापन केलेली आहे. सदर पुनर्विलोकन समितीची कार्यवाही पूर्ण होवून यासंदर्भात बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून शासनाचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर झालेला नाही. सदर प्रस्ताव शासनास सादर झालेनंतर शासनाकडून गुणवत्तेनुसार अंतिम निर्णय संकल्पित राहिल.

---

## पुणे शहरात पर्यावरण रक्षणाच्या हेतूने पुन्हा एकदा सायकलींचे शहर बनविण्यासाठी महापालिका कोट्यवधींचा खर्च करीत असल्याबाबत

**(३०) ४८५४० (१७-०५-२०१६). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरात पर्यावरण रक्षणाच्या हेतूने पुन्हा एकदा सायकलींचे शहर बनविण्यासाठी महापालिका कोट्यवधींचा खर्च करीत असल्याची बाब माहे डिसेंबर २०१५ च्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेसाठी सल्लागार कंपनी नियुक्त करण्यात येत असून, सल्ला देण्यासाठी तिला फक्त सव्वा कोटी रुपये अदा केले जाणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०९-२०१६)** :(१) व (२) पुणे शहर सर्वकष वाहतुक आराखड्या अंतर्गत व केंद्र शासनाच्या विशेष योजनेअंतर्गत सायकल प्लान विकासीत करणेसाठी सल्लागार कंपनीस रक्कम रुपये ११५.०० लक्ष देण्यात येणार आहेत. त्यापैकी ८०% म्हणजे रुपये ९२.०० लक्ष केंद्र शासनाच्या शहर विकास मंत्रालयाकडून देण्यात येणार आहेत व २० % रक्कम रुपये २३.०० लक्ष हे पुणे महानगरपालिकेकडून देण्यात येणार आहेत.

(३) संचालक शहर विकास मंत्रालय, भारत सरकार यांच्या दिनांक २०.०२.२०१४ च्या पत्रान्वये पुणे शहर सर्वकष वाहतुक आराखड्याअंतर्गत व केंद्र शासनाच्या विशेष योजनेअंतर्गत सायकल प्लान विकसीत करणेस मान्यता मिळालेली आहे. संबंधित सल्लागार कंपनीने कार्यदेशानुसार काम सुरु केले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पालघर नगरपरिषदेत नागरी सुविधा पुरविण्याबाबत

**(३१) ४९३७९ (०५-०५-२०१६). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर नगरपरिषदेची स्थापना होऊन १७ वर्षे होऊन देखील अद्यापही शहरातील अरूंद रस्ते, अपूर्ण गटारे, अस्वच्छता, आरोग्याची समस्या, भर रस्त्यात बसणारे फेरीवाले यामुळे होणारी वाहतूक कोंडी इ.समस्यांवर पालघर मधील नागरिकांनी पालघर नगरपरिषदेकडे वेळोवेळी तक्रार करूनही याबाबत कोणत्याही प्रकारे समाधानकारक नागरी सुधारणा होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नागरी सुविधा नागरीकांना मिळण्यासाठी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०९-२०१६) :**(१) हे खरे नाही

पालघर नगरपरिषदेने नगरपरिषद निधी व शानाकडून उपलब्ध होणाऱ्या विविध अनुदानातुन शहरातील मुख्य प्रमुख रत्याच्या बाजूकडल अतिक्रमणे दूर करून अरूंद रस्ते रुंदीकरण करून डांबरीकरण व क्रॉक्रिटिकरण करण्याचे काम हाती घेवून पूर्ण करण्यात आले आहे. तसेच सांडपाण्याची वाहत असलेली उघडी गटारे रस्त्याच्या दुतर्फा बांधकाम करण्याकरीता घेण्यात येवून कॉक्रिटिकरण बंदिस्त करण्यात आली आहे. तसेच नागरीकांच्या तक्रारी प्राप्त झाल्यास वेळेत दखल घेऊन कार्यवाही केलेली आहे व अद्यापही कार्यवाही करण्यात येते.

शहरातील आरोग्य व स्वच्छतेच्या बाबतीत नगरपरिषदेने १) दैनंदिन कचरा संकलन करणे (२) गटारी स्वच्छ करणे (३) डासांचे निमु१र्लन करण्याकरीता औषध फवारणी तसेच शहरात धुरीकरण करणे. याकरीता ठेकेदाराची नेमणुक केलेली आहे व त्यामार्फत आरोग्य व स्वच्छता राखली जाते.

(२) (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील शाळाबाह्य मुलांसाठी समाज विकास प्रकल्प बंद करण्याबाबत

**(३२) ४९६५४ (०५-०५-२०१६). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील शाळाबाह्य मुलांना शाळेच्या प्रवाहात आणण्यासाठी सन २००७ पासून चालविण्यात येणारा समाज विकास प्रकल्प बंद करण्याचा प्रस्ताव मुंबई महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांनी कामगार आयुक्तांकडे माहे डिसेंबर, २०१५ च्या दुसऱ्या आठवडयात वा त्यासुमारास पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विभाग चालू ठेवणे किंवा बंद करणे याचा अधिकार पालिकेच्या शिक्षण समितीला आहे हे, ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू विभाग बंद करण्याची कारणे काय आहेत, या प्रस्तावावर कामगार आयुक्तांनी कोणता निर्णय घेतला आहे,

(४) अद्यापही यासंदर्भात निर्णय घेतला नसल्यास, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०९-२०१६) :**(१) हे खरे नाही

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) बृहन्मुंबई महानगरपलिकेच्या शिक्षण खात्याच्या अस्थापनेवरील प्रकल्प समन्वयक, मुख्य समाज विकास अधिकारी व समाज विकास अधिकारी तसेच समाज संघटक या संवर्गाची पदे शिक्षण खात्याचा अनुसूचीवरून सहाय्यक पदे शिक्षण खात्याच्या अनुसूचीवरून सहाय्यक आयुक्त (नियोजन) यांच्या आस्थापना अनुसूचीवर घेण्याचे अतिरिक्त आयुक्त (शहर) यांनी आदेश दिले होते. त्यानुषंगाने समाज विकास अधिकारी, सहाय्यक आयुक्त(नियोजन) यांच्य आस्थापनेवर सन २०१३ पासून हजर झाले व ९ समाज संघटक हे अद्यपि शिक्षण विभागाच्या आस्थापनेवर कार्यरत आहेत.

सन २०१५ मध्ये म्युनिसिपल युनियन यांनी या विरोधात जाऊन कामगार आयुक्त यांच्याकडे दाद मागितली, त्यावर कामगार आयुक्त यांनी, संघटना आणि महापालिका प्रशासन यांनी सामोपचाराने सदर प्रश्न निकाली काढावा असे आदेश दिले.

---

## मुंबईतील मेट्रो-३ मार्गाच्या प्रकल्पाबाबत

**(३३) ५००२८ (०७-०५-२०१६). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मेट्रो-३ मार्गा अंतर्गत सीप्झ ते वांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स टप्पा माहे जून, २०१९ पर्यंत, वांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स ते सायन्स मुझियम टप्पा माहे डिसेंबर, २०१९ आणि त्यानंतर कफ परेडपर्यंतच्या अंतिम टप्पा माहे एप्रिल, २०२० पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दीष्ट शासनाने ठरविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्प उद्दीष्टाप्रमाणे विहीत वेळेत होण्यासाठी जमीन संपादन, रेल्वे व स्टेशन्सचे बांधकाम, मेट्रो कोच, डबे इत्यादीसाठी कोणती उपाययोजना करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०९-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) मेट्रो स्टेशनच्या बांधकामासाठी प्रस्तावित मेट्रो रेल्वे स्थानके व सुविधा करीता आवश्यक असलेल्या जमिनीचा तपशिल तयार करण्यात आला असुन भुसंपादन प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. सरकारी व निमसरकारी विभागाकडून आवश्यक जमिनीचे हस्तांतरण प्रक्रिया अंतिम टप्पयात आहे. खाजगी जमिनी संपादनाची कार्यवाही प्रगती पथावर आहे. स्थापत्य बांधकाम (रेल्वे स्थानके व बोगदा) यासाठी कंत्राटदाराची नेमणूक प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

मेट्रो रेल्वेचे डबे संबंधित कामासाठी रेल्वे निविदकारची पुर्ण अर्हता प्रक्रिया दि. १ डिसेंबर, २०१५ रोजी सुरू करण्यात आली असुन निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. आरे कॉलनीत कार डेपोसाठी सदर अधिसुचनेबाबत मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. तर्फे आक्षेप केंद्रीय पर्यावरण मंत्रालय यांना सादर करण्यात आलेले आहे. तसेच आरे कॉलनीमध्ये कार डेपो उभारण्यासाठी सुधारीत प्रस्ताव सादर करण्यात आला असून सदर प्रस्ताव शासनस्तरावर तपासण्यात येत आहे.

---

### गोवंडी (मुंबई) येथे शताब्दी रुग्णालयात वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याबाबत

**(३४) ५०७७२ (१७-०५-२०१६). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील पूर्व उपनगरामध्ये गोवंडी येथे शताब्दी रुग्णालयात वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्यासाठी महापौरांनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे माहे मार्च-एप्रिल, २०१५ च्या दरम्यान पत्र देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०९-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) व (३) पं. मदनमोहन मालविय शताब्दी रूग्णालय, गोवंडी हे २१० रुग्णशय्येचे रूग्णालय असून. वैद्यकीय महाविद्यालय उभारण्यसाठी येथे ४६० खाटांची आवश्यकता आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सदर रूग्णालयाचे विस्तारीकरण प्रस्ताविले असून त्याबाबतची HIC CELL मार्फत प्रक्रिया सुरू आहे. विस्तारीकरणांनतर सदर रुग्णालयात ८५० खाटा उपलब्ध होणार आहेत.

---

### राज्यातील नागरीकांसाठी सर्वांना घरे निर्मिती करण्याबाबत

**(३५) ५०८८६ (०३-०५-२०१६). अॅड.वारीस पठाण (भायखळा), श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नागरीकांसाठी सर्वांना घर हे स्वप्न पूर्ण करायचे असेल तर सरकारने मंजूरी प्रक्रियांचे सूसूत्रीकरण आणि कालबध्द कार्यक्रमांतर्गत पावले उचलायची आवश्यकता असून पुढच्या पाच वर्षात मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरणामार्फत (एम.एम.आर.डी.ए.) तीन लाख घरांची निर्मिती करण्याचा इरादा नॅशनल रिअल इस्टेट डेव्हलपमेंट कौन्सिल (नरेडको) ने माहे नोव्हेंबर, २०१५ वा त्या सुमारास व्यक्त केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आगामी काही वर्षात दहा ते पन्नास लाख रुपयांपर्यंत वन रुम किचन, वन बी.एच.के, टू बी. एच.के. अथवा २६९ ते ६४५ चौ. फुटांच्या आकाराची परवडणाऱ्या किंमतीतील घरे कर्जत, कसारा, बदलापूर, पालघर, यासह मुंबईत विविध भागांत निर्मितीचा प्रस्ताव 'नरेडको' ने शासनाकडे दाखल करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०७-१०-२०१६) :**(१) नरेडको या संस्थेने मुंबई महानगर क्षेत्रामध्ये येत्या ५ वर्षात २ लक्ष घरांची कटीबध्दता दर्शविली आहे

(२) यासंदर्भात नरेडको ने प्राथमिक माहिती शासनास सादर केली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वसई-विरार शहरातील बेपत्ता व्यक्तींचा तपास करण्याबाबत

**(३६) ५१२७९ (१६-०५-२०१६). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार शहरातील ७ पोलीस ठाण्यांमध्ये १,१९४ व्यक्ती बेपत्ता असल्याचे सन २०१४ ते २०१५ या वर्षात नोंदी करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापैकी किती बेपत्ता व्यक्तींचा तपास पोलीसांनी लावला आहे व किती अद्याप बाकी आहेत व यामध्ये महिला, अल्पवयीन मुली, विद्यार्थी व प्रौढ यांची संख्या किती आहे,

(३) तसेच बेपत्ता असलेल्या व्यक्तीच्या तपासाची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०८-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे. सन २०१४-१५ मध्ये एकूण २४५१ व्यक्ती बेपत्ता असल्याची नोंद करण्यात आली आहे.

(२) व (३) या प्रकरणी एकूण १८७२ बेपत्ता व्यक्तींचा तपास लागलेला असून एकूण ५७९ व्यक्तींचा शोध सुरू आहे.

बेपत्ता व्यक्तींची वर्गवारी सन २०१४ व सन २०१५

| | मुले | मुली | पुरूष | स्त्रीया | विद्यार्थी | प्रौढ |
|---|---|---|---|---|---|---|
| एकूण | १६ | २९ | २७५ | २५२ | १ | ६ |

---

## मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यात पार्किंगची जागा देण्यात विकासकांकडून होत असलेली टाळाटाळ

**(३७) ५१५२३ (१७-०५-२०१६). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगरातील विविध भागात नियमानुसार सुमारे एक लाख गाड्यांच्या पार्किंगची जागा मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यात देण्यात विकासकांनी टाळाटाळ केली असल्याची गंभीर बाब माहे फेब्रुवारी, २०१६ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार पार्किंगच्या जागा मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यात न देणाऱ्या विकासकांवर शासनाकडून कोणती कठोर कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-१०-२०१६) :**(१) ते (४) अशी बाब नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने आतापर्यंत ६१ (४६३६६ पार्किंग क्षमता) सार्वजनिक वाहनतळाच्या प्रकल्पाना मंजूरी दिलेली आहे. त्यापैकी १८ (१०७५३ पार्किंग क्षमता) वाहनतळांचे काम पूर्ण आहे. पूर्ण झालेल्या वाहनतळापैकी ९ (४२६४ पार्किंग क्षमता) वाहनतळ प्रकल्प बृहन्मुंबई महानगरपालिकेस हस्तांतर झालेले आहेत. पूर्ण झालेले तथापि बृहन्मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरण न झालेले प्रकल्प लवकरच महानगरपालिकेस हस्तांतरण होणार आहेत.

मध्यंतरीचे कालावधीत मा.सर्वोच्च न्यायालयाने नियमानुसार सोडावयाचे खुले क्षेत्र हे जमीन पातळीवर ठेवण्याचे आदेश दिलेले होते. त्याचप्रमाणे शासनाने वाहनतळाच्या विनियमामध्ये दिनांक ६.८.२०१४ रोजीच्या अधिसूचनेन्वये फेरबदल मंजूर केलेले आहेत. त्यामुळे प्रकल्पाचे आराखडे त्याचेशी सुसंगत ठेवणे क्रमप्राप्त झालेले असल्याने प्रकल्पाचे बांधकाम जलद गतीने पूर्ण होवू शकलेले नसले तरी ते आता पूर्ण होणेस तांत्रिक अडचणी नाहीत.

---

**कराड नगरपरिषद विकास आराखड्यामध्ये सर्व्हे नं. ४२५/१-२/अ मध्ये आरक्षित जागेवर नगरपरिषदेने बांधकाम परवानगी दिल्याबाबत**

**(३८) ५१६६१ (०३-०५-२०१६). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील कराड नगरपरिषद हद्दीतील मंजूर विकास आराखड्यामध्ये सर्व्हे क्रमांक ४२५/अ/१-२/ अ मधील जागा कोणत्या प्रयोजनासाठी आरक्षित करण्यात आली आहे.

(२) असल्यास, आरक्षण डावलून कराड नगरपरिषदेने बांधकाम करण्यासाठी संबंधितांना तसेच बिनशेतीसाठी सहाय्यक संचालक, नगररचना सातारा यांनी दिनांक ६ फेब्रुवारी, २०१४ रोजी ना हरकत प्रमाणपत्र दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याची कारणे काय आहेत आणि या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०९-२०१६) :**(१) मंजूर विकास योजना कराड (दु.सू.) मधील प्रस्तावानुसार सं.नं क्रमांक ४२५/१+२ अ ही जागा रहिवास विभागात समाविष्ट असून विकास योजनेच्या कोणत्याही प्रस्तावाने बाधित होत नाही. सदर जमिन कराड नगरपरिषदेच्या हद्दीत स्थित असली तरी ती शेजारील मलकापुर नगर पंचायतीच्या हद्दीलगत आहे. शासनाने मलकापुर नगर पंचायतची विकास योजना भागश: मंजूर करून उर्वरीत भागासाठी सारभूत फेरबद्दल (Substantial Modifications) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ३१ (१) अनव्ये दि. ०६.०९.२०१४ रोजी प्रसिध्द केले. या सारभुत फेरबदलाअंतर्गत ई.पी१२५ नुसार १८.० मी.प्रस्तावित रस्त्याची आखणी दर्शविणारी बिंदुरेषा (Dotted Line) कराड नगरपरिषदेच्या हद्दीतील उक्त जमिनीतुन राष्ट्रीय महामार्गाच्या सेवा रस्त्यास नियोजनाच्या दृष्टीने जोडण्याचे सांकेतीक स्वरूपात दर्शविण्यात आले आहे.

(२) सहायक संचालक, नगर रचना, सातारा शाखा कार्यालयाने पत्र क्र. २२९, दि. ०६/०२/२०१४ रोजीच्या पत्रान्वये स.नं ४२५/१+२ अ क्षेत्र १०५० चौ.मी. च्या रेखांकनास मंजुरीची शिफारस मा. जिल्हाधिकारी, सातारा यांचेकडे केली आहे व नगर परिषदेने दि. २६/०८/२०१४ रोजी बांधकाम परवानगी मंजूर केली आहे.

(३) उक्त मिळकत मंजूर विकास योजना, कराड (दु.सु.) नुसार कोणत्याही प्रस्तावाने बाधीत होत नसल्याने त्यास रेखांकन मंजूरीची शिफारस केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील आर. एन. कुपर रुग्णालयातील कामगार व परिचारिकांच्या कमतरतेबाबत**

**(३९) ५२०४२ (१७-०५-२०१६). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील आर. एन. कुपर हॉस्पिटल मध्ये एकूण पाच शस्त्रक्रियागर (OT) असून केवळ कामगार व परिचारिकांच्या कमतरते अभावी फक्त दोन शस्त्रक्रियागर कार्यरत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सर्व विभागांना मिळून फक्त दोन शस्त्रक्रियागर असल्यामुळे शस्त्रक्रियेसाठी तेथील रुग्णांना वाट पहावी लागत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यामुळे गंभीर रुग्णांच्या आयुष्याला धोका निर्माण होऊ शकतो, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त रुग्णालयातील कामगार व परिचारिकांच्या कमतरतेमुळे उद्भवणा-या समस्यांवर शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०९-२०१६) :**(१) हे खरे नाही. डॉ.आर. एन कुपर रुग्णालयात एकूण १४ शस्त्रक्रियागार (OT) असून ती सर्व कार्यरत आहेत
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) सदर रुग्णालयात कामगार व परिचाररिकांची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही महपालिकेमार्फत सुरू आहे.

---

**मुंबईतील अंधेरी येथील हॉटेल एअरपोर्ट मेट्रो येथे गुंड संदिप गाडौली हा पोलिसांच्या गोळीबारात मृत झाल्याबाबत**

**(४०) ५२९८३ (२४-०५-२०१६). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील अंधेरी येथील हॉटेल एअरपोर्ट मेट्रो येथे हरयाणातील खतरनाक गुंड संदिप गाडौली हा पोलिसांच्या गोळीबारात दिनांक ७ फेब्रुवारी, २०१६ रोजी मृत झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणाचा तपास करण्याचे आदेश मुंबईच्या पोलीस आयुक्तांनी मुंबई क्राईम ब्रँचला दिले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर तपासात काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१६) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) सदर घटनेबाबत एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.९२/१६ कलम ३०७, ३५३, ३३२ भा.द.वि.स. सह ३, २५, २७ भा.ह.का. अन्वये गुन्हा दाखल केला असून विशेष तपास पथकाने तपासामध्ये निष्पन्न झाल्याप्रमाणे नमूद गुन्ह्यात कलम ३०२, २०१, १८२, १९३, ३४, १२०

(ब) भा.द.वि.सं. सह ३, ३५, २७ भा.ह.का. नुसार बदल करुन प्रकरण तपासाधीन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील म्हाडाच्या ५४ वसाहतींमधील इमारती जुन्या व जीर्ण अवस्थेत असल्याबाबत**

**(४१) ५४४६७ (२९-०८-२०१६). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील म्हाडाच्या ५४ वसाहतींमधील इमारती जुन्या व जीर्ण अवस्थेत असल्यामुळे व इमारतींचा पुनर्विकास करतांना विकासकाने प्रिमियम ऐवजी म्हाडाला घरे बांधून द्यावीत या तत्कालीन शासनाच्या निर्णयामुळे मुंबईतील एकाही म्हाडा वसाहतींचा पुनर्विकास झालेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, म्हाडाला तयार घरे देण्याबाबतच्या धोरणात्मक निर्णयात सध्याच्या मा.गृहनिर्माण मंत्र्यांनी बदल करुन पुन्हा विकासकाकडून प्रिमियम घेण्याबाबत अनुकूलता दर्शविली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मा.गृहनिर्माण मंत्र्यांनी याबाबत निर्णय घेतला असल्यास अंमलबजावणीची सद्यःस्थिती काय आहे वा याबाबत शासनाची भूमिका काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०६-१०-२०१६) :**(१) हे खरे नाही. तथापि मुख्य अधिकारी, मुंबई गृनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई यांच्या अहवालानुसार सन २०१३ मध्ये सुधारित वि.नि.नि. ३३(५) मधील तरतुदीनूसार पुनर्विकासाचे ८२ प्रस्ताव म्हाडास प्राप्त झालेले असून त्यापैकी ४१ प्रस्तावांना म्हाडाकडून देकारपत्र देण्यात आलेले आहे व १७ प्रस्तावांना ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्य शासनाच्या विविध विभागात मागासवर्गीयाच्या पदांचा अनुशेष असल्याबाबत.**

**(४२) ५५४०८ (२३-०८-२०१६). श्री.विजय औटी (पारनेर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या विविध विभागात मागासवर्गीयांच्या सुमारे २९ हजार ६६१ पदांचा अनुशेष कायम असून दरवर्षी सरळसेवा व पदोन्नतीने पदे भरण्याकडे शासनाचे दुर्लक्ष होत चालल्याने रिक्त पदांचा अनुशेष वाढत असल्याचे दिनांक ३ मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रिक्त पदे न भरण्याची कारणे काय,

(३) असल्यास, सदर अनुशेष भरून काढण्यासाठी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०९-२०१६) :**(१) दि.३१ मार्च, २०१४ अखेर राज्यात मागासवर्गीयांची सुमारे २९,६११ पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) वेतनवाढीचा सरासरी दर हा महसूल वाढीच्या सरासरी दरापेक्षा अधिक असता कामा नये हे सर्वमान्य तत्व पाळण्याच्या अनुषंगाने शासन निर्णय वित्त विभाग, क्रमांक:- संकिर्ण २०१५/प्र.क्र.४१/अर्थ-१, दि. २ जून, २०१५ नुसार नवीन पदनिर्मितीस व पद भरतीस निर्बंध घालण्यात आले आहेत.

(३) नवीन पदे भरतीबाबत निर्बंध असल्याने सरळसेवेची सर्व रिक्त पदे भरणे शक्य नाही. तथापि, पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त पदे भरण्यास कोणतेही प्रतिबंध नाहीत. पदोन्नती कोटयातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही नियमित सुरू आहे. त्याचप्रमाणे पदोन्नती कोटयातील रिक्त पदे भरण्याच्या दृष्टिने दि. १६ ऑगस्ट, २०१६ व दि. १९ ऑगस्ट, २०१३ रोजी अनुक्रमे पुणे व औरंगाबाद येथे विभागीय आयुक्तांबरोबर मा.सचिव (सा.वि.स.) सामान्य प्रशासन विभाग यांच्या आढावा बैठकीचे आयोजन करून संबंधीतांना पदोन्नतीची पदे तात्काळ भरण्याबाबत सुचना दिल्या आहेत. तसेच, इतर विभागात सुध्दा अशा आढावा बैठका आयोजित करून पदोन्नती कोटयातील रिक्त पदे भरण्याच्या दृष्टिने कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ऐरोली, नवी मुंबई एमआयडीसी परिसरात स्वतंत्र औद्योगिक प्रशिक्षण संस्था स्थापन करणेबाबत

**(४३) ५६५६१ (२९-०८-२०१६). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई शहराची लोकसंख्या १२ लाखापेक्षा जास्त असूनही एवढ्या मोठ्या विभागासाठी बेलापूर येथे एकच औद्योगिक प्रशिक्षण संस्था कार्यरत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेलापूर येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये सर्वच विद्यार्थ्यांना प्रवेश मिळत नाही त्यामुळे त्यांना पाहिजे त्या ट्रेड मधून शिक्षण मिळत नसल्यामुळे बेरोजगारीचे प्रमाण वाढले असल्याने ऐरोली एमआयडीसी परिसरात स्वतंत्र औद्योगिक प्रशिक्षण संस्था स्थापन करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०११ मध्ये उच्च व तंत्रशिक्षण मंत्री महोदयांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिलेल्या निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी निलंगेकर-पाटील (०७-१०-२०१६)** :(१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) ऐरोली येथे औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू करण्यात प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव संचालनालयाने शासनास सादर केला आहे. प्रस्तुत प्रस्तावांतर्गत पदनिर्मिती,यंत्रसामुग्री खरेदी, बांधकाम इत्यादीचा समावेश आहे. राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील असंलग्न व बंद होणाऱ्या अभ्यासक्रमांच्या तुकडयांची यंत्रसामुग्री वर्ग करण्याबाबत समिती गठित करण्यात आली होती. सदर समितीच्या शिफारशी शासनास प्राप्त झालेल्या असून या शिफारशींवर धोरणात्मक निर्णय झाल्यानंतरच नवीन अद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू करण्यासंदर्भात कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थाच्या फि वाढीबाबत

**(४४) ५६६७३ (२९-०८-२०१६). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रशिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना सन २०१५ पासून रुपये ६० ऐवजी रुपये १९५० एवढी फी लागू केली असून खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांकडून रुपये ३० हजार फी घेण्यास शासनाने परवानगी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर फी वाढीमुळे राज्यभरातील बरेच विद्यार्थी औद्योगिक प्रशिक्षणापासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर फी कमी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी निलंगेकर-पाटील (०७-१०-२०१६)** :(१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) राज्यातील शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांसाठी लागू करावयाच्या प्रशिक्षण शुल्क नियमावलीस उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दिनांक १४.०५.२०१५ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार प्रशिक्षणार्थीकडून रूपये १०००/- संस्था विकास शुल्क घेण्यात आले होते. सदर संस्था विकास शुल्क रद्द करून प्रशिक्षणार्थींना परत करण्याचा निर्णय कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या दिनांक ०५.११.२०१५ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. त्यानुसार प्रशिक्षणार्थींना रूपये १०००/- शुलक करण्याची कार्यवाही व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय स्तरावरून सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महात्मा जोतिबा फुले यांच्या जीवनावरील चित्रपटाचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(४५) ५८८०८ (२३-०८-२०१६). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्त्री शिक्षणाच्या पाया रचणारे थोर समाजसुधारक महात्मा जोतिबा फुले यांच्या जीवनावरील चित्रपटाचे काम गत १२ वर्षे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत तसेच महात्मा फुलेंच्या १२५ व्या स्मृती वर्षात या चित्रपटाची निर्मिती आणि प्रदर्शन तात्काळ करण्याचे आदेश मा.मुख्यमंत्री यांनी माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-१०-२०१६) :**(१) होय.

(२) महात्मा फुले यांच्या जीवनावरील चित्रपट केंद्र शासन, मध्यप्रदेश शासन व महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने तयार करण्याचे ठरविण्यात आले होते. परंतु केंद्र शासन व मध्यप्रदेश शासन यांच्याकडून आर्थिक मदत उपलब्ध न झाल्याने चित्रपटाचे काम पूर्ण होऊ शकले नाही. होय.

(३) याप्रकरणी केंद्र शासन व मध्यप्रदेश शासन यांच्याकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील ९२ एकर जमिनीवर बांधलेल्या जुन्या बि.डी.डी. चाळींचा पुनर्विकास करण्याबाबत**

**(४६) ५८९०६ (२९-०८-२०१६). श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सुमारे ९२ एकर जमिनीवर ९२० वर्षापूर्वी बांधलेल्या बीडीडी चाळींचा पुनर्विकास करण्याबाबत मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १३ जानेवारी, २०१६ रोजी बैठक घेण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बीडीडी चाळीतील रहिवाशांना त्यांच्या पूर्वीच्याच ठिकाणी नविन सदनिका दिल्या जाणार असून सरासरी सदनिकांचे क्षेत्रफळ ४०५ ते ५०२ स्क्वेअर फूट असणार आहे, तसेच या प्रकल्पाच्या माध्यमातुन म्हाडास १६००० सदनिका उपलब्ध होणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बैठकीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच सदर पुनर्विकासाच्या प्रकल्पाला केंव्हा सुरुवात केली जाणार आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१३-१०-२०१०)** :(१) होय मा. मुख्यमंत्री महोद्यांच्या अध्यक्षतेखाली दि.१३.०१.२०१६ रोजी बैठक घेण्यात आली होती.
(२) व (३) बी.डी.डी. चाळीच्या पुनर्विकासासंदर्भात दिनांक ३०.०३.२०१६ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णयातील तरतुदींच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही सुरू असून त्यानुसार बी.डी.डी. चाळीच्या पुनर्विकासाकरीता स्वतंत्र विनियम तयार करण्याची कार्यवाही नगर विकास विभागाकडून सुरू असून त्यासंदर्भात जनतेकडून हरकती मागविण्याच्या अनुषंगाने दि. २३.०८.२०१६ रोजी वा त्या विभागाकडून अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली आहे.

---

**आष्टी, पाटोदा व शिरूर येथील विकास कामांसाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत**

**(४७) ६२३९८ (२९-०८-२०१६). अॅड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आष्टी, पाटोदा व शिरूर (जि. बीड) येथील गौण खनिजावरील शुल्काच्या रकमेपोटी शासनाकडे सुमारे ५० लक्ष रुपये जमा आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या धोरणानुसार सदरहू रक्कम येथील विविध विकासकामांसाठी खर्च करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आष्टी, पाटोदा, शिरूर येथे सदरहु गौणखनिज निधीतून कोणती विकास कामे शासनाने केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०७-१०-२०१६)** :(१) सन २०१५-१६ या वित्तीय वर्षामध्ये बीड जिल्ह्यांतर्गत रु. १३.६६ कोटी इतका गौण खनिज महसूल प्राप्त झाल्याची नोंद आहे.
(२) महाराष्ट्र खनिज विकास निधी अधिनियम, २००१ अन्वये खनिज महसूलाच्या १०% रक्कम विकास कामांसाठी देय ठरते. खनिज विकास निधी अंतर्गत खाणबाधित क्षेत्रातील विकासात्मक कामे करण्याकरिता शासन निर्णय दिनांक १ ऑगस्ट, २०१२ च्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे कार्यवाही करण्यात येते.
(३) खनिज विकास निधी अंतर्गत बीड जिल्ह्यातील रु. ९८८.७९ लक्ष रकमेच्या ९६ प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून त्यामध्ये आष्टी तालुक्यातील रु. ३०.०० लक्ष रकमेची ३ कामे आणि शिरुर तालुक्यातील रु.५८.४७ लक्ष रकमेची ६ कामे यांचा समावेश आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अमरावती येथे स्व.रा.सु. गवई यांचे स्मारक उभारण्याबाबत

**(४८) ६२४८७ (२३-०८-२०१६). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथे दिवंगत नेते रा.सु. गवई यांचे स्मारक उभारण्याचा निर्णय शासनस्तरावर घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयाचे अनुषंगाने अमरावती येथे स्मारक उभारण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) स्मारकासाठी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथील ९.४६ हे आर. एवढे क्षेत्र जिल्हाधिकारी, अमरावती यांच्याकडे सूपूर्द करण्यात आले असून यासाठी पालकमंत्री, अमरावती यांचे अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीमार्फत स्मारकाचे आराखडे व खर्चाचे अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

---

### म्हाडा इमारतींच्या पुर्नवसनाबाबत

**(४९) ६३३४९ (२९-०८-२०१६). श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडा इमारतींच्या पुर्नवसनाबाबत ९३(५) धोरणात बदल केल्याच्या आदेशाला एक वर्ष होऊनही म्हाडाकडून त्याची अदयाप अंमलबजावणी करण्यात आली नसल्यामुळे म्हाडा वसाहतीच्या पुनर्वसनाचे काम प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, म्हाडा वसाहतीच्या पुनर्वसनाचे काम तातडीने होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०६-१०-२०१६) :**(१) हे खरे नाही.

म्हाडाच्या मुंबईतील वसाहतींच्या पुनर्विकासासंदर्भात विनियम ३३(५) मधील तरतुदीनूसार कार्यवाही करण्यात येते.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील आयटीआय प्रवेश प्रक्रियेबाबत**

**(५०) ६४६४४ (२९-०८-२०१६). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील तरुणांना कौशल्य विकास आणि उद्योजकतेचे धडे देणाऱ्या आयटीआय प्रवेशाबाबत व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालयाकडून आयटीआय प्रवेश प्रक्रियेबाबत माहिती देणारे संकेतस्थळ चालु करण्याबाबत तसेच विविध कोर्सेसची माहिती पुरविणाऱ्या पुस्तिकेची छपाई करणेबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याची बाब माहे मे, २०१६ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी निलंगेकर-पाटील (०७-१०-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) इयत्ता १० वी निकाल दिनांक ०६ जून, २०१६ रोजी घोषित होवून दि. १५ जून, २०१६ पर्यंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वाटप करण्यास सुरवात झाली होती. प्रवेश नियमावली व प्रवेशपध्दतीची प्रवेशोच्छुक उमेदवारांना तसेच संबंधित पालकवर्गास माहीती होण्यासाठी माहितीपुस्तिका भाग-१ व भाग-२ या पुस्तिकेच्या प्रती मुद्रांकित करून दि. १५ जून, २०१६ पासून संबंधितांना उपलब्ध करून देण्यांत आल्या आहेत.

औ.प्र.संस्थांची प्रवेशसत्र माहे ऑगस्ट, २०१६ सत्राची प्रवेश प्रक्रीया राबविण्यांस दिनाक २१.०६.२०१६ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली. त्यानुसार तात्काळ प्रवेश प्रकीया राबविण्यांत येत असून दिनांक २२ जून, २०१६ रोजी जाहीर केल्यानुसार Online प्रवेश अर्ज दि. २७ जून, २०१६ पासून उमेदवारांना उपलब्ध करून देण्यांत आला आहे प्रवेश वेळापत्रक वर्तमानपत्रात, प्रवेश संकेतस्थळावर व संचालनालायाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यांत आले अहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**नागपूर.** **प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.